# व्यावसायिक नीतिशास्त्र
## (Professional Ethics)

अनैतिकता ही केवळ व्यक्तीपूरता मर्यादित नसते. व्यक्तीच्या आचरणातून किंवा चारित्र्यातूनच तिचे स्वरूप प्रगट होत नाही. तर तीची व्याप्ती सामाजिक स्वरूपातही पहावयास मिळते. व्यक्ती जीवनास सहाय्यक ठरणाऱ्या किंवा त्यांचा विकास साधणाऱ्या काही सामाजिक संस्थादेखील असतात. त्या संस्था आपल्या मुळ उद्देशापासून दूर गेल्या किंवा त्यांचे स्वरूप विकृत झाले. तर त्यास 'सामाजिक अनैतिकता' असे म्हणता येते. शासन, वैद्यक, विधी, शिक्षण किंवा व्यापार अशा त्या संस्था म्हणून सांगता येतात. ज्या समाजात अशा संस्था योग्य रीतीने कार्य करतात, त्या समाजातील व्यक्तींचा सर्वांगीन विकास होऊ शकतो. याऊलट ज्या समाजात अशा संस्थांचे स्वरूप भ्रष्ट झाले असेल, तर त्या समाजाचे अध:पतन होते. अशा संस्थांचे महत्वांचे घटक असणाऱ्या ज्या व्यक्ती आहेत, उदा.- शिक्षक, वैद्यक, वकिल, व्यापारी यांचे आचरण भ्रष्ट झाले की सामाजिक संस्था भ्रष्ट होतात. पर्यायाने समाजही भ्रष्ट होतो, समाजाची घडी विस्कळीत होते. म्हणून अशा घटकांचा नैतीक दृष्टीकोनातून विचार करावा लागतो.

**व्यवसायाचे स्वरूप :** (Nature of profession)

क्लार्क (Clarke) यांच्या मते " व्यवसाय म्हणजे असे संघटन आहे की, ज्यात स्वत:चे विशिष्ट असे ज्ञान असते, ज्या ज्ञानात मानवी कल्याणाची तीव्र कर्तव्यभावना

असते." बॉवर (Bower) यांच्या मते "व्यवसाय हे सुसंघटीतपणे केले जाणारे कार्य आहे. ज्यात विकसीत, इतरांपर्यंत पोहचणाऱ्या किंवा इतरांना जाणवणाऱ्या कौशल्यामार्फत औपचारिक ज्ञानाचा वापर केला जातो."

कोणत्याही व्यवसायात प्रामुख्याने समाजाच्या समस्या सोडविल्या जातात, समाजाला सेवा देण्यासाठी कौशल्याचा वापर केला जातो. या सेवेतून फायदा किंवा बक्षीस मिळावे अशी अपेक्षा फारशी नसते. सेवा देताना व्यवसायिकास आनंद मिळतो, स्वत:च्या कामाविषयी अभिमान वाटत असतो. आपली सेवा गुणात्मक दृष्ट्या उच्च प्रतिची असावी असा प्रयत्न प्रत्येक व्यवसायात असतो. व्यवसायिक ज्ञान शास्त्रीय स्वरूपाचे असल्याने त्या ज्ञानापासून समाजास इजा पोहचत नाही. व्यवसाय हा प्रामुख्याने सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून केला जातो. एवढेच नाही तर प्रत्येक व्यवसायाचे एक व्यावसायिक उत्तरदायित्व असते. हे उत्तरदायित्व त्याच्यासाठी बंधनकारक असते. व्यवसायात व्यावसायिकाचे चारित्र्य, सेवातत्परता, नम्रता, औदार्य अशा गोष्टी महत्वाच्या असतात. व्यवसायास समाजात विशेष असे आदराचे स्थान असते. इतरांच्या तुलनेत व्यावसायिकास सामाजिक प्रतिष्ठा अधिक असते. ही प्रतिष्ठा जोपासणे, वाढवणे ही त्याची जबाबदारी असते. तसा प्रयत्न व्यावसायिकांकडून सतत केला जातो. प्रत्येक व्यवसायासाठी एक विशिष्ट आचारसंहिता (Code of Conduct) असते. तिचे पालन बंधनकारक मानले जाते. कोणताही व्यवसाय नैतिकतेच्या पायावर उभा असतो.

## व्यवसाय आणि व्यापार : (Profession and Business)

सामाजिक संस्थाच्या माध्यमातून कार्य करणाऱ्या घटकांचे दोन प्रकारात वर्गीकरण करता येते. व्यवसायिक आणि व्यापारी. या ठिकाणी आपल्याला व्यवसाय आणि व्यापार यात मुलभूत असा भेद कोणता ? हे पहावयाचे आहे तो पुढील विवेचनावरून लक्षात येऊ शकतो.

१) अर्थार्जन करणे हा जसा व्यापाराचा उद्देश असतो तसाच तो व्यवसायाचा देखील असतो. परंतू व्यापार हा केवळ अर्थार्जनाच्या हेतून केला जातो तर व्यवसायात 'सेवा' (Service) महत्वाची असते. उदा. - एखादा वैद्यक जेव्हा निदान करत असतो, तेव्हा तो स्वत:चा काय फायदा होईल यापेक्षा इतरांना मदत कशी होईल याचाच विचार करतो. याऊलट व्यापारी क्रय विक्र्यातून किती नफा होईल याचाच विचार करतो.

२) व्यापाराचा संबंध दृष्य, मूर्त, उपभोग्य वस्तूंशी येत असतो. ज्यांचा क्रय विक्रय हा प्रामुख्याने संख्यात्मक स्वरूपाचा असतो, ज्यांचे मूल्य निश्चित पैशांनी चुकवता येऊ शकते. याऊलट व्यवसाय हा अमूर्त, अदृष्य सेवेशी निगडीत असतो. ज्याचे मूल्य निश्चित पैशांनी ठरवता येत नाही. सेवेचे स्वरूप गुणात्मक असते.

३) व्यापार हा प्रामुख्याने वैयक्तिक हिताला प्राधान्य देणारा असतो. याऊलट व्यवसाय सामाजिक हिताला जोपासणारा असतो.

४) व्यापाराची यशस्वीता आर्थिक फायद्यावरून ठरविली जाते. तर व्यवसायाची यशस्वीता सेवेच्या गुणवत्तेवरून ठरविली जाते.

५) सर्वात महत्वाचे म्हणजे व्यापारात सामाजीक उत्तरदायीत्वाची भावना नसते. ती व्यवसायात असते. माझ्या यशात व मला मिळालेल्या सामाजिक प्रतिष्ठेमागे समाजाचे योगदान आहे. त्यामुळे मी देखील समाजासाठी काहीतरी योगदान दिले पाहिजे ही सामाजिक उत्तरदायीत्वाची भावना केवळ व्यवसायातच असते.

वरील मुद्यांचा विचार केल्यास असे लक्षात येते की, व्यापारापेक्षा व्यवसायास समाजात प्रतिष्ठा आहे. अलिकडील काळात काही व्यवसायिक निव्वळ अर्थप्राप्ती हा हेतू ठेवत आहेत. त्यामुळे काही व्यवसायांचे अस्तित्व आज धोक्यात आले आहे. व्यवसायाचे व्यापारीकरण झाले आहे. विविध व्यवसायात निरनिराळ्या अनैतिकता निर्माण झाल्या आहेत. त्या अनैतिकतांचे स्वरूप कसे आहे ? त्यासाठी काही उपाययोजना करता येतील का ? याचा विचार व्यावसायिक नीतिशास्त्रात केला जातो.

## नैतिकता आणि नियम : (Morality and Law)

'योग्य (Right) म्हणजे जे नियमानुसार आहे' अशी आपण योग्य या संकल्पनेची व्याख्या पाहिली. परंतू नियम म्हणजे काय ? नियमाचा आणि नैतिकतेचा संबंध कसा आहे ? हे देखील पाहणे गरजेचे ठरते. निसर्गात घडणाऱ्या घटनांची एकविधता किंवा सर्व व्यक्तींच्या आचरणातील एकजिनसीपणा म्हणजे नियम होय. नियम चार प्रकारचे असतात.

१) काही नियम स्थल काल परिस्थितीनुसार बदलणारे असतात तसेच त्यांचे काही कारणाने उल्लंघन झाले तर फारसा फरक पडत नाही. त्यासाठी कुणाचा विरोधही नसतो. उदा.- सामाजिक नियम.

२) काही नियम आवश्यकतेनुसार बदलणारे असतात. परंतू एकदा नियम म्हणून मान्यता मिळाल्यास त्यांचे उल्लंघन करता येत नाही. त्यांचे उल्लंघन दंडनीय असते. उदा.- राजकीय नियम.

३) काही नियम कधीच बदलत नाहीत. परंतू त्या नियमांचे उल्लंघन केले जाऊ शकते. उदा.- तर्कशास्त्राचे नियम.

४) काही नियम कधीच बदलत नाहीत किंवा त्याचे उल्लंघन करता येत नाही. उदा. - निसर्ग नियम.

वरील सर्व नियम पाहिल्यास लक्षात येते की काही नियम व्यक्तीवर बाह्य परिस्थितीतून लादले जात असतात. त्यांचे स्वरूप 'काय आहे ?' (What it is ?) असे वस्तुनिष्ठ असते किंवा 'कसे असलेच पाहिजे ? (What must be ?) असे आदेशवजा असते. नैतिक नियमांचे स्वरूप यापेक्षा वेगळे असते. ते केवळ वस्तुस्थितीचा निर्देश करणारे नसतात किंवा आदेशवजाही नसतात. नैतिकता व्यक्तीवर बाहेरून लादता येत नाही. किंवा बाहेरून लादलेल्या गोष्टींचे नैतिक समर्थनही करता येत नाही. ती आंतरिक असावी लागते. कांटच्या शब्दात सांगायचे झाल्यास 'एखादा नियम मी जोपर्यंत आंतरिक प्रेरणेने स्वत:वर लादून घेत नाही, तोपर्यंत तो मला नैतिकदृष्ट्या बंधनकारक असत नाही.' मानव विवेकी आहे, त्याच्याकडे सत्संकल्परूपी बुध्दी आहे. त्याला जसे संकल्पाचे स्वातंत्र्य आहे तसे निर्णयाचे, विशेषत: नीतिनिर्णयाचे स्वातंत्र्य आहे. त्यामुळे योग्य काय, अयोग्य काय याचा निर्णय तो घेऊ शकतो. म्हणून कोणतेही नियम बाहेरून लादून चालत नाहीत. तर नैतिकता ही आंतरिक प्रेरणेतून स्वीकारलेल्या नियमांतच असते. नैतिक नियम हे 'कसे असावे ?' (What ought to be ?) अशा आदर्शात्मक स्वरूपाचे असतात.

## व्यवसाय आणि नैतिकता : (Profession and Morality)



समाजात अस्तित्वात असणाऱ्या निरनिराळ्या व्यवसायांचा आणि नैतिकतेचा अनन्यसाधारण संबंध आहे. सद्य: परिस्थितीत व्यावसायिक आदर्श समाजातून हद्दपार होऊ लागला आहे की काय ? अशी शंका निर्माण होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण आज केवळ 'पैसा' हे मानवी जीवनाचे सर्वात महत्वाचे मूल्य बनले आहे. व्यवसायांचे व्यापारीकरण झाले आहे. अशा परिस्थितीत दिवसेंदिवस समाजाचे अध:पतन होऊ लागले आहे. नैतिकता वरचेवर कमी होऊ लागली आहे, नव्हे-नाहीशी होऊ लागली आहे. ही चिंतनीय बाब आहे.

नैतिकता हे व्यक्तीजीवनाचे तसेच समाजजीवनाचे सर्वात महत्वाचे अधिष्ठान आहे. नैतिकतेविना व्यक्तीजीवन पशुतुल्य बनते. समाज हा नुसताच पशुंचा एक कळप बनून राहतो. नैतिकता हे मानवी जीवनाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. म्हणून ज्यांच्या आधारावर समाज उभा आहे अशा व्यवसायात नैतिकता असणे अनिवार्य ठरते. संपूर्ण मानवी जीवनाला स्पर्श करून सुसंस्कृत बनवणारा शिक्षण व्यवसाय असेल/मानवी जीवनाचे अस्तित्व कायम राखणारा किंवा जीवनाची वृध्दी करणारा वैद्यकीय व्यवसाय असेल/मानवी समाजाचे आणि संस्कृतीचे रक्षण करणारा विधी व्यवसाय असेल, यांना पाया नैतिकतेवर आधारितच असला पाहिजे. संपूर्ण समाज या व्यवसायांकडे आपेक्षेने पाहत असतो. 'कुंपणच शेताचे रक्षण करित नसेल तर दाद कुणाला मागायची ?' या उक्तीप्रमाणे अशा व्यवसायातूनच जर नैतिकता राहणार नसेल तर आदर्श समाज किंवा नैतिक समाज ही कल्पनाच फोल ठरते. आपल्या उदरनिर्वाहासाठी किंवा भौतिक गरजांच्या पूर्तीसाठी अर्थप्राप्ती करणे गरजेचे आहे. पण त्याचबरोबर सामाजिक उत्तरदायित्वाची भावना जोपासणे त्याहून महत्वाचे आहे. कोणत्याही व्यवसायाची एक विशिष्ट अशी नैतिक संहिता असते. त्या संहितेचे पालन प्रत्येक व्यावसायिकाने प्रामाणिकपणे करणे हे त्याचे कर्तव्य आहे.

व्यावसायिक आपल्या कार्यात तज्ञ असतात. त्यांच्याकडे स्वत:चा व्यवसाय प्रभावीपणे करण्याची ताकद असते. विशिष्ट प्रकारच्या कौशल्याची सत्ता त्यांच्याकडे असते. या सत्तेला आचरणाच्या नियमांनी नियंत्रित करणे अत्यंत गरजेचे असते. अन्यथा या सत्तेचा वापर स्वत:च्या स्वार्थासाठी व समाजाच्या शोषणासाठी होऊ शकतो. त्यामुळे

काही नैतिक बंधने अनिवार्य ठरतात. व्यावसायिकाचे ज्ञान व कौशल्य तसेच नैतिक संहिता (Moral code) यांना समन्वय उच्च प्रतीची सेवा देऊ शकतो.

आज प्रचलित असलेले व्यवसाय अगदी प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. त्यावेळी देखील अशा व्यवसायांसाठी विशिष्ट अशी मार्गदर्शक तत्वे होती. परंतू या व्यवसायांचे स्वरूप आजच्यासारखे गुंतागुंतीचे किंवा भ्रष्ट नव्हते. त्यामुळे फारशा समस्या किंवा अनैतिकता निर्माण आलेल्या नव्हत्या. परंतू जसा समाज प्रगत होऊ लागला तशा समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात समस्या निर्माण होऊ लागल्या. विज्ञानाने प्रचंड अशी प्रगती केली. सर्व भौतिक सुखसुविधा विज्ञानाने निर्माण केल्या. प्रत्येकाची दृष्टी भौतिकवादी बनली. मानवाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. समाजजीवनात, सामाजिक संबंधात अमूलाग्र असे बदल घडून आले. हळूहळू समाजाचे स्वरूप भ्रष्ट बनले. त्यातूनच अनेक समस्या, अनैतिकता निर्माण झाल्या. व्यावसायिक नीतिशास्त्राच्या अनुषंगाने काही विशिष्ट व्यवसायात निर्माण झालेल्या प्रमुख अनैतिकता व त्यावरील उपायांची चर्चा आपण पुढील प्रकरणात पाहणार आहोत.

०००



७

# शिक्षण व्यवसाय
## (Teaching Profession)

मानवाच्या मूलभूत गरजा भागवणाऱ्या व्यवसायाबद्दल आणि तो व्यवसाय करणाऱ्या लोकांबद्दल आपण कृतज्ञ असलेच पाहिजे. परंतू त्या पलीकडे जाऊन व्यक्तीचे संपूर्ण जीवन समृध्द करणारी, समाजाचा विकास करणारी किंवा मानवी जीवनाचा स्तर उंचावणारी काही मूल्ये असतात. अशा वैयक्तिक, सामाजिक गरजा पूर्ण करणारे क्षेत्र म्हणजे शिक्षण हे क्षेत्र होय. सर्व प्रकारच्या वैयक्तिक व सामाजिक विकासाचा पाया शिक्षणातूनच घातला जातो. जीवनातील कोणत्याही प्रगतीचा आधार शिक्षण हाच असतो. दुसरे असे की इतर सर्व व्यवसायांचा मानवी जीवनाच्या कोणत्यातरी एका विशिष्ट क्षेत्राशी संबंध येतो. परंतू शिक्षण हे मानवी जीवनाच्या सर्वांगास स्पर्श करणारे, त्याचा विकास करणारे असते. तिसरे असे की शिक्षण ही अत्यंत पवित्र व उदात्त बाब आहे असे प्राचीन काळापासून आजही मानले जाते. कारण मानवाला पशुत्वाकडून देवत्वाकडे घेऊन जाण्याचे कार्य शिक्षण करत असते. मानवास रानटी अवस्थेकडून सुसंस्कृतपणाकडे घेऊन जाण्याचे कार्य शिक्षण करत असते. त्यामुळे या क्षेत्राकडून समाजाच्या अनेक प्रकारच्या नैतिक अपेक्षा आहेत. या शिक्षण प्रक्रियेतील सर्वात महत्वाचा घटक शिक्षक हाच आहे. तोच आपल्या अध्यापनाच्या माध्यमातून या सर्व गोष्टी साध्य करण्याचा प्रयत्न करत असतो.

शिक्षणाची प्रक्रिया मानवा एवढीच प्राचीन आहे. पूर्वीच्या काळी शिक्षणाचे ध्येय फारसे व्यापक किंवा सामाजिक स्वरूपाचे नव्हते तर ते मर्यादीत किंवा वैयक्तिक स्वरूपाचे होते. शिक्षक विद्यार्थ्यांना विशिष्ट पध्दतीचे शिक्षण देऊन एक स्पर्धक या स्वरूपात विद्यार्थ्यांची तयारी करून घेत असत. अलीकडील काळात शिक्षणाचे स्वरूप व उद्दिष्ट या दोन्ही गोष्टीत मूलभूत असा बदल घडून आला आहे. आजच्या शिक्षण पध्दतीत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून त्याला समाजात व्यवस्थित जीवन जगता यावे अशी तयारी करून घेतली जाते. बदलत्या सामाजिक परिस्थितीत आज अनेक समस्या निर्माण होत आहेत. संपूर्ण जगावर निर्माण झालेले युध्दाचे सावट, जातीय तणाव, धार्मिक संघर्ष, दहशतवाद, कामगारांच्या समस्या, भ्रष्टाचार अशा कितीतरी समस्याना आज तोंड द्यावे लागत आहे. या सर्व समस्यांचे एकच उत्तर आहे. ते म्हणजे शिक्षण -विशेषतः नैतिक शिक्षण, असे कुणीही निश्चितपणे सांगु शकेल. आधुनिक शिक्षण संस्थांच्या माध्यमातून मुलांना वर्तमान समाजजीवनाची जवळून ओळख करून दिली जाते. एवढेच नाही तर समाजात वेळोवेळी घडून येणारी स्थित्यंतरे, वैयक्तिक आणि सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव यांचे ही शिक्षण दिले जाते. अशा वेळी शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. कारण मुलांचे वय आणि मन या दोन्ही गोष्टी अतिशय संस्कारक्षम असतात. त्यांना शालेय जीवनातच योग्य वळण देता येऊ शकते. अशा अनेक कारणांमुळे समाज हा शिक्षणसंस्था किंवा शिक्षक या घटकाकडे मोठ्या अपेक्षेने पाहत असतो.

परंतू बदलत्या समाजजीवनात इतर क्षेत्रात जसे अमूलाग्र बदल घडून आले तसे बदल शिक्षण क्षेत्रातही घडून आले. हे सर्व बदल विकासाच्या दृष्टीने होणे आवश्यक होते. परंतू दुर्दैवाने हे बदल चुकीच्या दिशेने घडून आले. इतर क्षेत्रांप्रमाणे या क्षेत्रातही अनेक अनैतिकता किंवा समस्या निर्माण झाल्या. त्यांचे थोडक्यात स्वरूप खालीलप्रमाणे सांगता येते.

## शिक्षण व्यवसायातील समस्या : (Problems of Educational profession)

१) शिक्षणाचा घसरत चाललेला दर्जा – शिक्षण याचा अर्थ 'व्यक्तीला सर्वांगाने सुसंस्कृत करणे' असे होतो. परंतू आज शिक्षण म्हणजे केवळ 'साक्षर करणे' एवढाच



अर्थ अभिप्रेत राहिलेला आहे. शासन किंवा विद्यापीठाने नेमून दिलेला विशिष्ट साच्याचा अभ्यासक्रम विशिष्ट मुदतीत शिकवून विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी तयार करून घेणे एवढेच आज शिक्षणात अभिप्रेत आहे. शिक्षणाची अनेक ध्येये सांगता येतात. ती ध्येये जर साध्य झाली तर प्रत्येक विद्यार्थी सुसंस्कृत तर बनेलच त्याच बरोबर तो समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून देखील समर्थपणे कार्य करू शकेल. इंग्रजांनी सुरू केलेली कारकून निर्माण करणारी शिक्षण पध्दती आज ही तशाच स्वरूपात अस्तित्वात असल्याने शिक्षणाचा दर्जा दिवसेंदिवस घसरत चालला आहे. परिणामी चारित्र्यसंपन्न व सुसंस्कारित पिढी निर्माण होण्याऐवजी केवळ परिक्षार्थी पिढी निर्माण होऊ लागली आहे. त्यातूनच प्रचंड प्रमाणात बेकारी व या बेकारीच्या नैराश्यातून समाजविघातक कृत्ये करणारी पिढी निर्माण होऊ लागली आहे.

२) शिक्षकांच्या चारित्र्याचा किंवा आदर्श वर्तनाचा अभाव – शिक्षकांचे व्यक्तीमत्व अनुकरणीय असले पाहिजे. कारण विद्यार्थी हे अनुकरणप्रिय असतात. शिक्षकाचे व्यक्तीमत्त्व व चारित्र्य कसे आहे यावरच शिक्षक व विद्यार्थी यांचे संबंध निर्माण होतात. त्यामुळे शिक्षकाने आपल्या व्यक्तीमत्वाची किंवा चारित्र्याची काळजी घेतली पाहिजे. शिक्षकाचे व्यक्तीमत्व हे त्याच्या जीवननिष्ठा, त्याची विचारसरणी, त्याचा आपल्या व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टीकोन किंवा विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन अशा गोष्टींमुळे ठरत असते. दुर्दैवाने या सर्व गोष्टी हळूहळू कमी होत चाललेल्या दिसून येत आहे. अलीकडील काळात 'पैसा' हे एकमेव जीवनमूल्य बनले असून सर्व प्रकारच्या विचारसरणी प्रामुख्याने उपयुक्ततावादी बनल्या आहेत. आपला व्यवसाय पवित्र व उदात्त आहे या गोष्टीकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नाही. संस्थाप्रमुखासमोर लाचारी पत्करणे, व्यवसायबंधूंची निंदानालस्ती करणे, विद्यार्थ्यांशी औपचारिक संबंध ठेवणे, विद्यार्थीनींशी गैरवर्तन करणे, अशा कितीतरी गोष्टी सांगता येतात.

३) आर्थिक गैरव्यवहार : समाजातील इतर क्षेत्रांप्रमाणे आर्थिक गैरव्यवहाराचे प्रचंड निर्माण शिक्षण क्षेत्रातही वाढलेले दिसून येते. व्यवसायाचा हेतू उपजीविकेसाठी अर्थार्जन करणे हा असला तरी अतिरिक्त द्रव्यलालसेमुळे शिक्षणक्षेत्रात विविध पातळ्यावर आर्थिक गैरव्यवहार वाढलेला दिसतो. वर्गात शिकवण्याची टाळाटाळ करून

खाजगी शिकवण्या घेणे, गाईड्स लिहिणे, स्वतःच्या व्यवसायासोबत इतर व्यवसाय करणे, परिक्षेच्या संदर्भातील सर्व प्रकारच्या गैरव्यवहारात मदत करणे, अशा अनेक मार्गांनी शिक्षक अर्थप्राप्ती करताना दिसतात. संस्थाचालकांसाठी शिक्षण संस्था ही निव्वळ अर्थप्राप्तीचे साधन झाले आहे. अवास्तव देणग्या घेऊन नोकरभरती करणे, विकासनिधी व इतर शुल्कांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक करणे, शासकीय निधीचा योग्य विनियोग न करणे, कर्मचाऱ्यांचे वेतन न देणे अशा अनेक मार्गांचा वापर संस्थाचालक करत असतात. विद्यार्थीदेखील प्रामाणिकपणे अभ्यास करण्याऐवजी परिक्षेपूर्वी पेपर मिळवणे, कॉपी करणे, गुण वाढवून आणणे, तोतया परिक्षार्थीचा वापर करणे यासाठी आर्थिक गैरव्यवहार करताना दिसतात.

५) शासनाचा बेजबाबदारपणा - इतर देशांच्या तुलनेत भारतात शिक्षणाकडे पाहण्याचा शासनाचा दृष्टीकोन नेहमीच बेजबाबदारपणाचा राहिला आहे. इतर क्षेत्रांच्या तुलनेत जे महत्वाचे स्थान शिक्षणास द्यायला हवे होते ते आजही दिले जात नाही. अन्य क्षेत्रांच्या तुलनेत शिक्षणावर जसा खर्च करणे अपेक्षित होते तो केला गेला नाही व आजही होत नाही. शिक्षणक्षेत्रात ज्या सुधारणा आवश्यक होत्या, त्या केल्या गेल्या नाहीत. जुनी, कालबाह्य शिक्षणपध्दत आजही अस्तित्वात आहे. समाजाच्या गरजेनुसार शिक्षण देण्याचा प्रयत्न आज होत असला तरी तो योग्य वेळी होऊ शकला नाही. वेळोवेळी नेमलेल्या शिक्षणविषयक आयोगांनी ज्या शिफारसी सुचवल्या त्यांची योग्य अंमलबजावणी झाली नाही. गुणवाण, बुध्दीवान व कार्यक्षम व्यक्ती या व्यवसायाकडे आकर्षित व्हाव्यात असे वेतन व अन्य सवलती दिल्या गेल्या नाहीत. धंदेवाईक लोकांनी काढलेल्या शाळांवर नियंत्रण नाही, भ्रष्टाचारी व्यक्ती किंवा अधिकाऱ्यांवर कठोर कार्यवाही नाही, अशा कितीतरी बेजबाबदारपणाच्या गोष्टी सांगता येतात. अशा अनेक कारणांनी शिक्षण कालविसंगत होत गेले.

६) समाज किंवा पालकांची उदासिनता : पूर्वीच्या काळी शिक्षक जे बोलत असे किंवा जे शिकवत असे त्यानुसार शासन, समाज किंवा समाजातील व्यक्ती आचरण करत. म्हणजेच शिक्षकाला समाजात अतिशय सन्मान दिला जात असे. शिक्षक हा समाजाचा मार्गदर्शक होता असे म्हटले तरी ते चुकीचे ठरू नये. परंतू आज स्थिती



बदललेली आहे. ज्या शिक्षकांच्या हातात आपल्या मुलांचे भवितव्य सोपवलेले आहे त्या शिक्षकांच्या सुखदुःखाबद्दल, अडीअडचणींबद्दल समाज किंवा पालकवर्ग उदासिन बनलेला आहे. शिक्षकांवर होणाऱ्या अन्यायाच्या प्रतिकारासाठी किंवा त्यांच्या अडचणी संदर्भात पालकवर्ग कधीही पुढाकार घेत नाही. आपला पाल्य कोणत्या मार्गाने उत्तीर्ण होईल एवढीच चिंता त्यांना असते. शिक्षकांबद्दल आदर, त्यांच्या प्रतिष्ठेची जोपासना या गोष्टींना तिलांजली मिळाली आहे. उलट शिक्षकवर्गाचा उपहास, हेटाळणीच अधिक होताना दिसते. याचा परिणाम शिक्षण प्रक्रियेवर होतो.

वर प्रतिपादन केलेल्या अनैतिकता अगदी ठळक स्वरूपात व सर्वसामान्यपणे जाणवणाऱ्या आहेत. यापेक्षा वेगळ्या अनैतिकता असू शकतील. त्या सर्वांना विचार होणे हे देखील आवश्यक आहे.

नैतिक संहितेचे स्वरूप : (Nature of moral code)

कोणत्याही व्यवसायात प्रवेश करताना त्या व्यवसायाची आचरणविषयक एक नियमावली असते. तिलाच नैतिक संहिता (Moral code) असे म्हणतात. प्रत्येक व्यवसायिकाने ती आत्मसात करणे किंवा तीनुसार आचरण करणे अपेक्षित आहे. तशी संहिता शिक्षण व्यवसायासही आवश्यक आहे.

शिक्षकासाठी आचार संहिता : (Teacher's code of conduct)

अमेरिकेतील राष्ट्रीय शिक्षण मंडळाने (NEA) शिक्षण व्यवसायासाठी एक निश्चित अशी नैतिक संहित सांगीतली आहे. या संहितेत जी प्रतिज्ञा सांगीतली आहे. त्यात पाच मार्गदर्शक तत्वांचा समावेश आहे.

१) पहिले तत्व : 'बालक, युवक आणि प्रौढांना लोकशाही जीवनप्रणालीच्या दृष्टीने ज्ञान व कौशल्याभिमुख बनवणे, त्याना आनंदी, उपयुक्त तसेच आत्मनिर्भर जीवन जगण्यास तयार करून घेणे हे शिक्षण व्यवसायाचे पहिले कर्तव्य आहे.

२) दुसरे तत्व : 'पालकाच्या सहकार्यातून विद्यार्थ्यांच्या आचार आणि विचारांना योग्य ते वळण लावले पाहिजे. या दोघांच्या एकत्रित प्रयत्नातून विद्यार्थ्यांच्या

वैयक्तिक विकासासोबतच सामाजिक ध्येय ही साध्य करतां येऊ शकते.'

३) तिसरे तत्व : 'शिक्षकाने स्वत:च्या आचरणातून तसेच शाळा व समाज यांच्या अंतरक्रियेद्वारा विश्वस्त म्हणून कार्य केले पाहिजे.' हे संबंध जेव्हा सौहार्दपूर्ण, सहकार्यात्मक किंवा रचनात्मक दृष्टीकोनातून निर्माण होतील तेव्हाच शिक्षण प्रक्रिया अधिक प्रभावी होऊ शकते.'

४) चौथे तत्व : 'शिक्षक, संस्थाप्रमुख व संस्थाचालक यांचे संबंध एकमेकांचा आदर करणारे व विश्वासपूर्ण असावेत. ज्यामुळे या व्यवसायाची प्रतिष्ठा वाढण्यास मदत होईल.'

५) पाचवे तत्व : 'शिक्षक-शिक्षकांतील अद्वितीय व गुणात्मक व्यावसायिक संबंधामुळे हा व्यवसाय इतर व्यवसायापेक्षा वेगळा समजला जातो. त्यामुळे हे संबंध मैत्रीपूर्ण, आदराचे तसेच विश्वासपूर्ण असावेत.'

वरील पाच तत्त्वांचे पालन शिक्षण व्यवसायात महत्वाचे मानले गेले आहे. ही तत्वे सूत्रबद्ध असल्याने त्यात अंतर्भूत असणारा गाभा लवकर लक्षात येणार नाही. त्या तत्त्वांचाच आधार घेऊन शिक्षकांसाठी आवश्यक असणारी नैतिक संहिता सोप्या शब्दात खालीलप्रमाणे सांगता येते.

१) शिक्षकाने आपल्या व्यवसाशी प्रामाणिक व एकनिष्ठ असले पाहिजे.

२) आपल्या चारित्र्याचा इतरांवर परिणाम होतो हे लक्षात ठेऊन आपले चारित्र्य नैतिक बनवले पाहिजे.

३) केवळ अर्थार्जन करणे हा हेतू मनातून काढला पाहिजे. सर्व आर्थिक गैरव्यवहारापासून अलिप्त राहिले पाहिजे.

४) आपल्या विषयाचे सर्वांगिण व सखोल ज्ञान आत्मसात केले पाहिजे.

५) विद्यार्थ्यांविषयी आपल्या मनात आत्मियता, प्रेम व जिव्हाळा बाळगला पाहिजे.

६) विद्यार्थ्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समान वागवले पाहिजे.

७) विद्यार्थ्यांमधील कमतरता किंवा वैयक्तिक गरजांच्या बाबतीत शक्य तेवढी मदत करावी.



८) विद्यार्थ्यांच्या हक्कांचा आदर करावा- ते त्यांना मिळतील असा प्रयत्न करावा.

९) पालकांशी सतत संपर्कात राहून वेळोवेळी विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी चर्चा करावी. पालकांशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करावेत.

१०) समव्यवसायिक, इतर व्यवसायिक किंवा संस्थाप्रमुखांशी चांगले संबंध ठेवावेत.

११) लोकशाही जीवनमूल्यांचा अंगीकार व पुरस्कार करावा.

१२) आपणही इतरांप्रमाणेच एक सामान्य नागरिक आहोत अशा भावनेतून सर्व सामाजिक कार्यात सहभाग नोंदवावा.

१३) 'समाजाचे आपल्यावर ऋण आहे, त्यामुळे समाजासाठी आपण काही योगदान दिले पाहिजे' ही सामाजिक उत्तरदायित्वाची भावना जोपासली पाहिजे.

विद्यार्थ्यांसाठी आचारसंहिता : (Students code of conduct)

शिक्षण प्रक्रियेतील विद्यार्थी हा घटक शिक्षकाएवढाच किंबहुना त्यापेक्षा महत्वाचा घटक आहे. म्हणून त्यानेदेखील काही गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे.

१) विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक व आत्मिक विकास घडवून आणणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. ते ध्येय साध्य करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे.

२) सहकारी विद्यार्थी, शिक्षक तसेच आदरणीय व्यक्तींच्या प्रति आदराची भावना जोपासली पाहिजे.

३) शिक्षणसंस्थेच्या सर्व नियमांचे प्रामाणिकपणे पालन केले पाहिजे. शिक्षणसंस्थेच्या मालमत्तेची स्वत:च्या मालमत्ते सारखी काळजी घेतली पाहिजे.

४) शासन किंवा संस्थेकडून गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना दिली जाणारी मदत आवश्यक असेल तरच स्वीकारावी. तिचा इतरांनाही लाभ मिळू द्यावा.

५) कोणत्याही प्रकारच्या गैरमार्गाचा अवलंब करू नये किंवा अशा गैरमार्गी लोकांच्या संपर्कात राहू नये.

६) सांस्कृतिक कार्यक्रमांच्या वेळी आपल्या संस्कृतीचे पावित्र्य राखले जाईल असे आपले वर्तन असले पाहिजे.

७) नियमीत उपस्थिती, गृहपाठ, अभ्यास, विविध उपक्रमातील सहभाग अशा गोष्टींचे

कटाक्षाने पालन केले पाहिजे.

८) उच्चप्रतीची खिलाडूवृत्ती अंगी बाळगली पाहिजे. खेळाच्या प्रसंगी खेळाडू किंवा प्रेक्षक अशा कोणत्याही भूमिकेत ही खिलाडूवृत्ती दाखवली पाहिजे.

९) सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या शिक्षणात समाजाचे फार मोठे योगदान आहे. तसेच समाजाला आपल्या सेवेची आवश्यकता आहे. ही भावना ठेवून समाजहितकारक सर्व उपक्रमात आपला सक्रिय सहभाग नोंदवावा.

याशिवाय इतरही अनेक मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करता येऊ शकेल. येथे केवळ महत्त्वाच्या तत्त्वांचा उल्लेख आहे.

०००



(८)

# विधी व्यवसाय
## (Legel Profession)

विधी व्यवसायाचा मानवी जीवनाशी अतिशय जवळचा संबंध आहे. 'वकिलांकडून मानवी सभ्यता चालविली जाते' (Lawyers run our civilization) असे म्हणतात. याचे कारण तो देशाच्या, समाजाच्या संस्कृतीचे रक्षण करतो. कोणत्याही लोकशाहीप्रधान समाजजीवनाचा कणा हा त्या समाजातील न्यायव्यवस्था ही असते. वकील हा न्यायव्यवस्थेचा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. वकीलाची भूमिका अनेक कारणांनी महत्त्वाची मानली जाते. बहुसंख्य प्रशासक किंवा लोकप्रतिनिधी प्रामुख्याने वकील असतात. देशाचे अध्यक्ष, राज्यपाल, उच्चायुक्त किंवा राजदूत हे प्रामुख्याने कायद्याचे पदवीधरच असतात. उद्योग आणि व्यापारात वकील महत्त्वाची भूमिका निभावत असतात. मोठमोठ्या उद्योगसमुहांचे संचालक बहुधा वकील तरी असतात किंवा कोणत्याही उद्योगसमुहांत वकीलांच्या कायदेशीर सल्ल्याची नेहमीच गरज भासत असते. एवढेच नाही तर आपल्या दैनंदिन जीवनातही वकिलाच्या मार्गदर्शनाची व सल्ल्याची गरज असते. संपत्तीचे वारसाहक्काने हस्तांतरण करणे, घटस्फोट घेणे, दत्तक विधान, कौटुंबिक कलह, अन्यायाविरुध्द दाद अशा अनेक प्रकारात वकीलाची आवश्यकता असते. समाजजीवन जगताना आवश्यक असणारे नियम तयार करणे व आवश्यक त्या औपचारिकता पार पाडण्याचे कार्य वकीलच करत असतात.

## विधी व्यवसाय आणि नैतिकता : (Legal Profession & Morality)

वर पाहिल्याप्रमाणे मानवी जीवनात वकिलाची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरते. समाजाच्या वकीली व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींकडून फार मोठ्या अपेक्षा असतात. म्हणून या व्यवसायाचे देखील एक नीतिशास्त्र आहे, त्यानुसार वकिलांनी आपले आचरण ठेवले पाहिजे. विधी व्यवसायाचे नीतिशास्त्र म्हणजे वकिलांनी पाळावयाची काही कर्तव्ये आहेत. विधी नीतिशास्त्र म्हणजे चांगले, वाईट; योग्य, अयोग्य अशा नीतिनिर्णयाचा अर्थ व त्यांचा वापर कसा करावयाचा हे सांगणारे शास्त्र होय. कायद्याने दिलेला प्रत्येक निर्णय हा नीतिनिर्णयच असतो. अशा पध्दतीचा विचार विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात सुरू झालेला दिसून येतो. विधी क्षेत्रात फसवणूक करणाऱ्या वकिलांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढू लागल्याने अशा स्वरूपाचा विचार नैतिक दृष्टीकोनातून होऊ लागला. त्यातूनच वकिलांच्या आचरणासंबंधी काही मानदंड निर्माण झाले. वकिलांनी त्या मानदंडानुसारच आचरण केले पाहिजे असा आग्रह होऊ लागला. हीच विधी नीतिशास्त्राची सुरुवात म्हणून सांगता येते.

वकीली व्यवसायात निर्माण होऊ लागलेल्या काही अनिष्ट प्रथांना आळा बसावा म्हणून नीतिसंहिता निर्माण झाली. तरीदेखील या व्यवसायातील काही प्रमुख समस्या नाहिशा होऊ शकल्या नाहीत. उलट वेगवेगळ्या स्वरूपात त्यांचे अस्तित्व आजही कायम आहे. त्या समस्या खालीलप्रमाणे सांगता येतात.

१) वकिलांची अतिरिक्त वाढती संख्या : व्यावसायिकांची संख्या ही एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात व मर्यादीत असेल तर त्या व्यवसायाची सेवा व्यवस्थित मिळू शकते. तसेच फारशा समस्यादेखील निर्माण होत नाहीत. परंतु उच्च शिक्षण व प्रवेश पात्रतेसंबंधी अनिश्चित धोरण अवलंबिल्यामुळे या व्यवसायात वकिलांची अमर्याद संख्या वाढत गेली. ज्ञान आणि चारित्र्य या दोन गोष्टी उच्च प्रतिची व्यावसायिक सेवा देऊ शकतात. परंतू अलीकडील काळात या दोन गोष्टींचाच अभाव प्रामुख्याने दिसून येतो. याला कारणीभूत स्वत: वकील तर आहेतच. पण समाज व शासन हे दोन्ही घटक तेवढेच कारणीभूत आहेत. वकिलांच्या वाढत्या संख्येमुळेच विधी व्यवसायात अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. दुसऱ्या महायुद्धापूर्वी इंग्लंड मध्ये २२७१



व्यक्तीमागे एक वकील असावा असे अभिप्रेत होते. अमेरिकेमध्ये १२८० मागे एक असे प्रमाण अपेक्षित होते. याच सर्वेक्षणानुसार प्रतिवर्षी ४५०० वकिलांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात प्रतिवर्ष ९५०० नवीन वकिल या व्यवसायात प्रवेश करत होते. हीच परिस्थिती आजही सर्वत्र पहावयास मिळते. अशा अतिरिक्त संख्येमुळे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात.

२) व्यवसायात गैरमार्गाचा प्रवेश : वकिलांची अतिरिक्त संख्या व शिस्तीच्या नियंत्रणाचा अभाव या कारणांमुळे या व्यवसायात गैरमार्गाचा प्रवेश झाला आहे. एका बाजूला नैतिक आदर्श व दुसरीकडे गैरव्यवहार अशा विरोधाभासात हा व्यवसाय सापडला आहे. गैरमार्गाने प्रकरणांचा शोध घेणे ही एक प्रामुख्याने निर्माण झालेली अनैतिकता आहे. त्यासाठी दलालांची देखील मदत घेतली जाते. अशा दलालांनी प्रकरणे आणली की त्यांना दलाली दिली जाते. वास्तविक अशा प्रकारचा व्यवहार बेकायदेशीर आहे. दुसरी बाब अशी की कागदपत्रांतील दोषस्थळांचा पुरेपुर फायदा वकील घेत असतात व आपल्या अशिलांची आर्थिक पिळवणूक करत असतात. सेवा शुल्कातील अनिश्चितता ही एक प्रमुख समस्या विधीव्यवसायात निर्माण झाली आहे. वास्तविक प्रकरणांच्या स्वरूपानुसार हे शुल्क निश्चित स्वरूपाचे असणे गरजेचे आहे. परंतू अधिक सेवाशुल्क आकारणे, प्रकरणे हेतुपुरस्सर लांबवणे, न्यायाधिशास 'मॅनेज' करणे, विरोधी पक्षकारांशी हातमिळवणी करणे, धनिकांना किंवा गुन्हेगारांनाच सेवा देणे अशा अनेक प्रकारचे गैरव्यवहार या व्यवसायात निर्माण झाले आहेत.

३) व्यवसायाचे व्यापारीकरण : सुरुवातीलाच पाहिल्याप्रमाणे केवळ अर्थार्जन करणे हा व्यापाराचा प्रमुख उद्देश असतो तर अर्थार्जनासोबतच समाजाला सेवा देणे हे व्यवसायाचे ब्रीद आहे. परंतू इतर व्यवसायांसोबत विधी व्यवसाय देखील व्यापारीकरणाच्या मार्गाने चालला आहे. समाजातील सर्वसामान्य घटकास आवश्यकतेनुसार सेवा देण्याऐवजी केवळ अर्थप्राप्ती करणे हे एकमेव उद्दिष्ट झाले आहे. काही वकील केवळ आयकर, विक्रीकर संदर्भातील प्रकरणे स्वीकारतात. काही वकील केवळ मोठमोठ्या उद्योग समुहांशी निगडीत अशीच कार्ये करतात. काहीजण केवळ गुन्हेविषयक प्रकरणे हाताळत असतात. अशा मार्गाने अधिक अर्थप्राप्ती होत असते.

त्याचा परिणाम असा होतो की न्याय हा केवळ श्रीमंतानाच मिळतो. सर्वसामान्य व्यक्तींना त्याचा उपयोग होत नाही.

४) सामाजिक जाणीवेची उणिव : वकिलांच्या आचरणात सामाजिक जाणीवेचा अभाव ही एक प्रमुख अनैतिकता मानता येते. आपल्यावर समाजाचे ऋण आहे, त्यामुळे आपण समाजाला काही देणे लागतो, समाजाची सेवा करणे हे आपले कर्तव्य आहे ही भावना जवळपास सर्व वकिलांच्या मनातून लोप पावली आहे. केवळ गल्लाभरू भ्रष्ट वकिलांचीच नाही तर समाजमान्य उच्चभ्रू वकिलांची प्रवृत्तीदेखील दिवसेंदिवस तशाच स्वरूपाची बनत चालली आहे. आपल्या व्यवसायासोबत वकीलांनी आपला काही वेळ समाज कल्याणकारी कार्यासाठी दिला पाहिजे. एवढेच नाही तर समाजातील दुर्बल घटकांसाठीदेखील आपली सेवा सहजपणे उपलब्ध करून दिली पाहिजे. सर्वसामान्यांना न्याय मिळवून देऊन आपल्या व्यवसायाची प्रतिष्ठा कायम राखणे हे वकीलाचे कर्तव्य आहे. परंतू तो प्रत्यक्षात त्याने आपल्या सेवा ज्या धनिकांना दिल्या आहेत अशा प्रकरणांच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करत असतो.

५) जुन्या पध्दतीचे सातत्य : वकील हा समाजव्यवस्थेचा केवळ घटकच नसतो तर जुनाट, कालबाह्य व्यवस्थेत सुधारणा करून समाजाला आधुनिकतेकडे घेऊन जाणे ही त्याची जबाबदारी असते. एवढेच नाही तर न्यायव्यवस्थेत निर्माण झालेले गैरप्रकार नष्ट करून न्याय व्यवस्थेची प्रतिष्ठा अबाधित राखण्याची जबाबदारी देखील त्याचीच असते. न्यायपध्दती ही काळाच्या व बदलत्या समाजाच्या गरजेनुसार बदलणे आवश्यक असते. परंतू दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. आपल्या समाजाच्या संदर्भात विचार केल्यास असे दिसते की जुन्या पध्दतींचे अस्तित्व आजही कायम आहे. जुन्या न्यायदानाच्या पध्दतीमुळे वर्षानुवर्षे प्रकरणे निकालात निघत नाहीत. पन्नास वर्षापुर्वी तत्कालीन गरजेनुसार निर्माण केलेले कायदे आज कालविसंगत झाल्याने कुचकामी ठरत आहेत. तरीही त्यांचे अस्तित्व आजही आहे. त्यात सुधारणा करायची ठरवले तरी काही व्यक्तींचे हितसंबंध त्यात अडथळा निर्माण करतात. अलीकडील काळात यात सुधारणा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पण त्याचे स्वरूप नगण्या आहे.



**विधी संहिता : (Legal code)**

इतर व्यवसायांप्रमाणे या व्यवसायासाठीदेखील एक निश्चित अशी आचारसंहिता आहे ती पाहण्यापूर्वी अमेरिकन बारमधील संघटनेच्या (ABA) विधीसंहितेच्या प्रस्तावनेत एका गोष्टीचा निर्देश आहे. तो महत्वाचा आहे.

''लोकशाही जीवनपध्दतीचा कणा विशुध्द व निष्कलंक न्याय व्यवस्था हा असतो. आपल्या व्यवसायातील सदस्यांचे आचरण व ध्येय सर्वसामान्य माणसांच्या गुणवत्तेच्या निकषावर उतरणार नाही तो पर्यंत अशी न्यायव्यवस्था निर्माण होऊ शकणार नाही.'' या प्रस्तावनेतच विधीसंहितेचा सारांश आहे. त्यात अभिप्रेत असणाऱ्या ठळक व महत्वाच्या बाबी खालीलप्रमाणे सांगता येतात.

१) न्यायसंस्थेचे पावित्र्य कायम राखणे हे वकिलाचे प्रमुख कर्तव्य आहे. न्यायप्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप अनावश्यक ठरतो. न्यायाधिशांच्या नियुक्त्या, अनावश्यक आदरातिथ्य किंवा खाजगीरित्या न्यायाधिशांशी संपर्क करणे गैर आहे. त्याची दक्षता वकिलाने घेतली पाहिजे.

२) वकिलाचे प्राथमिक कर्तव्य एखाद्या व्यक्तीस गुन्हेगार किंवा दोषी ठरवणे हे नसून न्याय मिळवून देणे हे आहे. आपल्या अशिलाच्या प्रकरणात आपण यश प्राप्त करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी न्याय प्रस्थापित कसा होईल याचा प्रयत्न करावा. वस्तूस्थितीकडे डोळेझाक करून, खोटे साक्षीदार तयार करून गुन्हेगारांना निरपराध सिध्द करणे दोषास्पद आहे.

३) सेवा शुल्काच्या संदर्भात निश्चितता असली पाहिजे. अतिरिक्त स्वरूपाचे शुल्क आकारणे हे योग्य नाहीच. पण आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सेवा शुल्कात शिथीलता ठेवली पाहिजे. पैसा आणि न्याय यांचा कोणत्याही प्रकारे संबंध येऊ देता कामा नये.

४) प्रकरणे मिळविण्यासाठी व्यापारी तत्वानुसार जाहिरातबाजी करणे चुकीचे आहे. परंतू स्वतःकडे एखादी विशेषता असेल तर विधी विषयक नीयतकालिकांमध्ये तशी सूचनावजा जाहीरात देणे गैर नाही. परंतू जाहिराती किंवा दलालांच्या माध्यमातून प्रकरणे मिळविण्याचा प्रयत्न करणे चुकीचे आहे.

५) पक्षकार आणि वकील यांच्या संबंधात अडथळा ठरतील अशा कोणत्याही व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या नियंत्रणाखाली वकीलाने कार्य करू नये. वकीलाची गुणवत्ता व जबाबदारी इतरांपेक्षा वेगळी असते. म्हणून त्याने असे सर्व संबंध टाळले पाहिजेत की ज्यामुळे त्याच्या कर्तव्यात बाधा निर्माण होईल.

६) आपण समाजाचे जबाबदार घटक आहोत. समाजाच्या ऋणाचे उत्तरदायित्व आपण निभावले पाहिजे. त्यासाठी समाज कल्याणकारक जे विविध उपक्रम राबविले जातात त्यात सहभागी झाले पाहिजे. समाजाच्या विकासासाठी आपला वेळ व सेवा दिली पाहिजे.

वर प्रतिपादन केलेली कर्तव्याची यादी परिपूर्ण आहे असे नाही. ही काही प्रमुख मार्गदर्शक तत्त्वे आहेत. किमान या तत्त्वांचे जरी प्रामाणिकपणे पालन केले तर या व्यवसायातील अनैतिकता बऱ्याच प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.

० ० ०

(6)

(१)

# वैद्यकीय व्यवसाय
## (Medical Profession)

वैद्यकीय व्यवसाय हा प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेला व्यवसाय आहे. या व्यवसायाचे मूलभूत ध्येय व्यक्तीच्या तसेच समाजाच्या आरोग्याची वृध्दी करणे किंवा रक्षण करणे हे आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास व्यक्तीचे शारीरिक आरोग्य सुधारून समाज कल्याणास हातभार लावणे हे वैद्यकीय व्यवसायाचे प्रमुख ध्येय आहे. इतर कोणत्याही व्यवसायापेक्षा वैद्यकीय व्यवसायाचे स्थान सर्वश्रेष्ठ मानले जाते. मानवी जीवनातील दुःख नाहीसे करून जीवनाची लांबी वाढवण्याचे कार्य वैद्यक करतो. म्हणून त्यास भूतलावरील ईश्वर असेही म्हणतात. कोणत्याही देशातील नागरिकांचे आरोग्य कसे आहे यावर त्या देशाचे भवितव्य बऱ्याच अंशी अवलंबून असते. या आरोग्याची काळजी घेण्याचे कार्य वैद्यक करत असतात. दुसरे असे की आपले केवळ मन नैतिक असून चालत नाही तर त्याला निरोगी कणखर शरीराची जोड असणे तेवढेच गरजेचे आहे. असे असेल तरच काही तरी कार्य करता येऊ शकते. या कार्यात वैद्यकाची भूमिका महत्वाची ठरते. अशा अनेक कारणांनी सर्वसामान्य लोक या व्यवसायाकडून फार मोठ्या प्रमाणात नैतिकतेची अपेक्षा करतात. परंतू हे ही क्षेत्र अनैतिकतेपासून दूर राहिले नाही. बदलत्या समाजजीवनाबरोबर या क्षेत्रातही अनेक बदल होत गेले. या क्षेत्रातही अनेक समस्या किंवा अनैतिकता निर्माण झाल्या. त्यातील काही प्रमुख समस्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येते.

## वैद्यकीय व्यवसायातील अनैतिकता : (Abuses in Medical Profession)

१) सेवा शुल्कातील अनिश्चितता : आधुनिक काळातील सेवा विशेषज्ञतेमुळे अशा प्रकारची समस्या प्रचंड प्रमाणात निर्माण झाली आहे. व्यवसाय हा देखील अर्थार्जनासाठीच केला जातो, असे आपण पाहिले. परंतू अर्थार्जन हा व्यवसायाचा दुय्यम हेतू आहे. सेवा हा प्राथमिक हेतू आहे. परंतू आजच्या युगात 'पैसा' हे मानवी मूल्य बनले, तानूस नैतिकतेऐवजी भौतिकतेच्या मागे लागला, त्याचा प्रभाव वैद्यकीय व्यवसायावरही झाला. आपला उदरनिर्वाह व्यवस्थित भागेल अशा दृष्टीने सेवा शुल्क आकारणे गैर नाही. परंतू अतिरिक्त द्रव्यलालसेपोटी आवश्यकतेपेक्षा अधिक शुल्क आकारण्याची प्रथा निर्माण झाली. विशेषत: जो नामांकित वैद्यक आहे त्याचे सेवा शुल्क सर्वसामान्यांना परवडणारे नसते. त्यामुळे त्याच्या सेवेचा लाभ विशिष्ट व्यक्तीनाच मिळू शकतो. तज्ञ वैद्यकाने इतर सर्वसामान्य वैद्यकांशी खाजगी संबंध असतात. हे सामान्य वैद्यक तज्ञांकडे काही रुग्ण पाठवतात. या व्यवहारातून अकार्यक्षम वैद्यकसुध्दा भरपूर प्रमाणात अर्थप्राप्ती करू शकतात. आर्थिकदृष्ट्या दुर्बलांसाठी शुल्कात सवलत देणे अपेक्षित आहे. परंतू प्रत्यक्षात तसे होतांना दिसून येत नाही. त्यामुळे त्यांना अकार्यक्षम किंवा नवशिक्या वैद्यकांकडून उपचार करून घ्यावे लागतात. याचा परिणाम काहीही होऊ शकतो.

२) पिशाच्च शल्यचिकित्सा : रुग्ण उपचारासाठी किंवा शस्त्रक्रियेसाठी एखाद्या नामांकित वैद्यकाकडे जातात. परंतू अशा वेळी तो नामांकित वैद्य स्वत:रुग्णांवर उपचार किंवा शस्त्रक्रिया करण्याऐवजी आपल्याच हाताखालच्या नवशिक्या वैद्यकाकडून करवून घेतात. या उपचारातून मिळणाऱ्या शुल्काचा अगदी थोडा भाग या नवशिक्या वैद्यकांना मिळतो. या उलट त्या नामांकित वैद्यकास काहीही न करता शुल्कातील बराच मोठा हिस्सा तर मिळतोच, त्याचबरोबर प्रतिष्ठाही मिळते. या प्रकारालाच पिशाच्च शल्यचिकित्सा असे म्हणतात. या शिवाय इतर ही प्रकार शल्यचिकित्सेच्या अनुषंगाने होताना दिसून येतात. आवश्यकता नसताना, आजार गंभीर आहे असे भासवून शस्त्रक्रिया करावयास लावणे, योग्य ठिकाणी शस्त्रक्रिया करण्याऐवजी चुकीच्या ठिकाणी करणे, चुकीच्या पध्दतीने शस्त्रक्रिया करणे, रुग्णांच्या नकळत पुनर्रोपण करता येणारे अवयव



काढून त्यांचा चोरटा व्यापार करणे असे राक्षसी प्रकार अलीकडील काळात निर्माण झाले आहेत. अशा प्रकारात प्रसंगी रुग्णांना आपले प्राणदेखील गमवावे लागतात. राक्षस किंवा पिशाच्च माणसाच्या जीवाशी ज्या पध्दतीने खेळतात तसाच काहीसा हा प्रकार असल्याने या प्रकारास राक्षसी शल्यचिकित्सा असेही म्हणतात.

३) सांघिक चिकित्सेचा दुरुपयोग : आधुनिक काळात वैद्यक शास्त्रात नवीन ज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास झाला. त्याची परिणती म्हणून सांघिक चिकित्सा पध्दती अस्तित्वात आली. ही चिकित्सा पध्दती आपल्याला लाभलेले वरदान आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. कारण विज्ञानाने जशी सुधारणा केली तसे काही गुंतागुंतीचे आजारही निर्माण केले. त्यासाठी ही उपचारपध्दती अतिशय उपयोगाची ठरते. असाध्य ठरलेल्या रोगांसाठी सांघिक चिकित्सा पध्दती फलदायी ठरते. या पध्दतीत एकाच रुग्णाला निरनिराळे तज्ञ तपासून अहवाल तयार करतात. ते सर्व अहवाल एकत्रित करून रुग्णाच्या आजाराचे निश्चित निदान केले जाते व अचूक उपचार केला जातो. परंतू अलिकडील काळातील वैद्यकांचा कल पैसे उकळण्याचा झाला असल्याने ते कारण नसताना रुग्णांना निरनिराळ्या चाचण्या करून घेण्यास भाग पाडतात. या प्रकारात मुख्य वैद्यक, इतर तज्ञ, वैद्यकीय प्रयोगशाळा, औषधी दुकान या सर्वांची एक व्यवस्थित साखळी असते. या साखळीमार्फत रुग्णांची बेमालूमपणे लूट केली जाते.

४) वैद्यकांचे असमान भौगोलिक वितरण : इतर व्यवसायांप्रमाणे वैद्यकांचे प्रमाण देखील लोकसंख्येच्या प्रमाणात असले पाहिजे. परंतू या व्यवसायात कार्य करणाऱ्या वैद्यकांची संख्या प्रमाणाबाहेर वाढलेली दिसून येते. तरीदेखील त्यांचे योग्य भौगोलिक वितरण झाल्यास फार समस्या निर्माण होणार नाही. दुर्दैवाने कोणत्याही देशात गरजेप्रमाणे वैद्यकांचे वितरण होत नाही. बहुसंख्य वैद्यक ग्रामीण भागात आपली सेवा देण्यास उत्सुक नसतात. त्यांचे शहरी भागातच केंद्रीकरण झालेले दिसून येते. त्यामुळे सर्वसामान्य वर्गास त्यांच्या सेवेचा लाभ घेता येत नाही. भारतीय संदर्भात विचार केल्यास आपल्या देशातील ८०% लोक ग्रामीण भागात राहतात. त्यामुळे उपलब्ध वैद्यकांपैकी ८०% वैद्यक ग्रामीण भागात असणे न्याय्य ठरते. प्रत्यक्षात ९० ते ९५ टक्के वैद्यक शहरी भागात केंद्रीभूत झालेले दिसतात. शासनाने ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रांनी

निर्मिती करून तेथे वैद्यकांसह अन्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असली तरी, हे वैद्यक तेथे न राहता जवळच्या शहरात खाजगीरित्या अर्थार्जन करतात. त्यामुळे समाजाचा एक मोठा वर्ग या सुविधांपासून वंचित राहतो, त्यांचे आरोग्य धोक्यात येते.

## वैद्यकीय संहिता : (Medical code)

वैद्यकीय व्यवसायात प्रवेश करण्यापूर्वी हिप्पोक्रेटस ने सांगीतलेली शपथ प्रत्येक वैद्यकाने घेतली पाहिजे असा दंडक आहे. ही शपथ म्हणजेच आजच्या वैद्यकीय संहितेचे प्राथमिक स्वरूप आहे. डॉ. थॉमस पार्सिव्हल यांनी १८०३ मध्ये आपल्या मुलाला, जो की वैद्यकीय व्यवसायात प्रवेश करणार होता-लिहिलेल्या पत्रात काही सूचना केल्या होत्या. त्या सूचनाच थोड्याफार बदलाने 'अमेरिकन डॉक्टर्स असोसिएशनने' १८४७ मध्ये वैद्यकीय संहिता म्हणून स्वीकारल्या. त्याचे संक्षिप्त स्वरूप खालीलप्रमाणे सांगता येते.

१) वैद्यकीय व्यवसायाचे उद्दिष्ट मानवतेची सेवा करणे हे आहे. बक्षिस किंवा आर्थिक फायदा हे दुय्यम स्वरूपाचे उद्दिष्ट आहे. मानवी जीवनातील दुःखांचा उपशमन करणे व मानवी जीवनाची वृध्दी व संवर्धन यासाठी वैद्यकाने आपले आयुष्य समर्पित केले पाहिजे.

२) आर्थिक लालसेपोटी एका वैद्यकाकडून दुसऱ्या वैद्यकाकडे रूग्ण पाठवणे अनैतिक आहे. तसेच अनिश्चित शुल्क पध्दती, भेटवस्तू, सूट देणे अशा स्वरूपाचा कोणताही आर्थिक गैरव्यवहार टाळला पाहिजे.

३) वैद्यकाने स्वतःच्या मालकीची शस्त्रक्रीयेची साधने, औषधे, उपचार पध्दती, संशोधनपर प्रकाशनांचे हक्क बाळगणे गैर नाही. परंतू त्यांचा केवळ फायद्यासाठी वापर करणे अनैतिक आहे. ते टाळले पाहिजे.

४) रूग्ण आपल्याकडे वळावेत यासाठी सेवा शुल्कात सूट देणे, दलालांना कमिशन देणे, जाहिरातबाजी करणे, शस्त्रक्रियेची साधने विकणारे किंवा औषधविक्रेत्यांकडून कमीशन स्वीकारणे अशा सर्वच गोष्टी पासून नेहमी दूर राहिले पाहिजे.





५) स्वतःच्या उपचार पध्दतीविषयी दुराग्रह बाळगू नये. अकुशल किंवा अप्रामाणिक व्यक्तींशी कसलाही संबंध ठेऊ नये. रूग्णाने आपल्यावर टाकलेला विश्वास जपावा. त्याच्या आजारा संदर्भात सार्वजनिक चर्चा करू नये. परंतू एखादा संसर्गजन्य रोग असेल व ज्यामुळे समाजाचे आरोग्य धोक्यात येत असेल तर अशावेळी त्याचा उल्लेख करावयास हरकत नाही.

६) रूग्णाचा आजार विनाकारण गंभीर भासवणे किंवा तो फारसा गंभीर नाही अशा स्वरूपाचे अतिरेकी निदान करू नये. तो नेमका कशा स्वरूपाचा आहे याचे अचूक निदान करून वेळेवर योग्य ते उपचार करावेत. अर्थात आणिबाणीच्या प्रसंगी कोणत्या रूग्णाला प्राथमिकता दिली पाहिजे याचे स्वातंत्र्य त्याला आहे.

७) वैद्यकाने आपल्या व्यवसायाची तसेच समव्यवसायिकांची प्रतिष्ठा व सन्मान राखला जाईल असे वर्तन ठेवले पाहिजे. आपले समव्यवसायिक जर भ्रष्टाचार किंवा अनैतिक वर्तन करत असतील तर त्यांचे वर्तन जाहीरपणे उघडकीस आणले पाहिजे.

८) सेवाभावी संस्था, सामाजिक संघटने किंवा विमा मंडळांकडून रूग्णांना मिळणारी आर्थिक मदत त्यांना मिळावी यासाठी आवश्यक तेथे सहकार्य करावे, ती मदत मिळावी यासाठी प्रयत्न करावेत.

९) आर्थिक फायद्यासाठी निर्माण केलेली किंवा वैद्यकांच्या सेवेचे शोषण करणारी रूग्णालये, संघटने, आर्थिक हितसंबंध जोपासणारे समूह यांच्यासाठी आपली सेवा देऊ नये किंवा अशा संस्थांचा सभासद होऊ नये.

१०) नवनवीन ज्ञान देणाऱ्या मान्यताप्राप्त आरोग्य शिक्षण योजनेत सहभागी व्हावे, आपले ज्ञान वृध्दिंगत करावे.

११) सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक तो सल्ला वेळोवेळी दिला पाहिजे. साथीच्या किंवा संसर्गजन्य रोगांचा फैलाव समाजात होऊ नये यासाठी प्रशासनातील अधिकारी वर्गास आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे. अशा रोगांच्या संदर्भात कोणती काळजी घ्यावी व काय उपाययोजना कराव्यात याचा वेळोवेळी सल्ला द्यावा.

वर प्रतिपादन केलेल्या नीतिसंहीतेतील तत्त्वे अधिक विस्ताराने सांगता येतात. त्यांचा केवळ साररूपाने उल्लेख केलेला आहे. या व्यतीरिक्त आणखी काही मार्गदर्शक

तत्त्वे सांगता येतील, पण ती फारशी महत्त्वाची नाहीत.

वैद्यकीय नीतिशास्त्र आणि जनहित : (Medical Ethics & Public Interest)

वैद्यकीय नीतिसंहितेमुळे सर्वोच्च नैतिक आदर्शांची निर्मिती होऊ शकेल काय ? की तिच्यामुळे केवळ वैद्यकाने स्वहित साधले जाईल ? दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास वैद्यकीय संहिता उच्च आदर्शवादाचा पुरावा मानता येईल का ? की तो सर्वसामान्य लोकांची फसवणूक करण्याचा प्रकार आहे ? असा प्रश्न या संदर्भात उपस्थित केला जातो. याला दोन्ही बाजूने उत्तर देता येते.

वैद्यकीय व्यवसाय प्राचीन असला किंवा त्याला इतिहास सन्मानजनक असला व आज इतर व्यवसायांपेक्षा सर्वाधिक प्रतिष्ठित मानला जात असला तरी मागील काही दशकात लोकांच्या मनात या व्यवसायाबद्दल आदर राहिला नाही. बदलत्या परिस्थितीत अकुशल व अकार्यक्षम वैद्यकांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे या व्यवसायाने समाजाचा आदर व प्रतिष्ठा गमावलेली आहे. विशिष्ट रुग्णांचे हितसंबंध जोपासण्यासाठीच ही संहिता किंवा रुग्णालये कार्य करत आहे. या व्यवसायाचे स्वरूप 'जनसेवा' असे बनण्याऐवजी 'खाजगी उद्योग' असे बनले आहेत.

ही झाली एक बाजू. दुसऱ्या बाजूने पाहिल्यास परिस्थितीनुसार वैद्यकीय संहितेत आवश्यक ते बदल होत आले आहेत. काही नवीन विचारप्रवाह या क्षेत्रातही निर्माण झाले आहेत. इतर व्यवसायांच्या तुलनेत वैद्यकीय व्यवसायाचे समाजासाठी फार मोठे योगदान आहे. याकडे दुर्लक्ष करता येत नाही. प्रत्येक देशात या व्यवसाया संदर्भातील तक्रार निवारण समिती आहे. ही समिती लोकांच्या तक्रारींची दखल घेते, त्याना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करते. एवढेच नाही तर व्यवसायात निर्माण झालेल्या समस्या किंवा अनैतिकतांचा शोध घेऊन त्या दूर करण्याचा प्रयत्न करते. वैद्यकांच्या विरोधातील तक्रारी संदर्भात वैद्यकाना दोषमुक्त किंवा दोषी ठरवणे, बडतर्फ करणे किंवा त्यांची हकालपट्टी करणे इ. कार्ये ही समिती करत असते. त्यामुळे वैद्यकीय संहिता या क्षेत्रात प्रभावी ठरते, नैतिक आदर्श निर्माण करण्यास सहाय्यक ठरते.

०००



# १०

# व्यापार आणि नैतिकता

## (Business & Morality)

औद्योगिक क्रांतीपूर्वी जगातील जवळपास सर्वच देशांचे स्वरूप शिकार, मासेमारी, पशुपालन किंवा शेती करणाऱ्या खेड्यांचा समूह अशा स्वरूपाचे होते. बहुतांशी उद्योग खेड्यातूनच चालत असत. प्रत्येक उद्योग हा वैयक्तिक स्वरूपाचा, परंपरागत रीतीने चालणारा होता. अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने हस्तकला किंवा कुटिरोद्योगावर आधारित होती. दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या वस्तूंची निर्मिती करून वस्तू विनिमयाच्या माध्यमातून त्यांची देवाण घेवाण होत होती. प्रत्येक कारागीराची हत्यारे स्वतःच्या मालकीची होती व ती अगदी साध्या स्वरूपाची होती. कामगारांचे एकमेकांशी असणारे संबंध वैयक्तिक व अनौपचारिक स्वरूपाचे होते.

औद्योगिक क्रांतीनंतर मोठमोठे उद्योगधंदे निर्माण झाले. वर प्रतिपादन केलेली परिस्थिती पूर्णपणे बदलून गेली. एकीकडे स्वतःची मालकी असणाऱ्या मालकांचा वर्ग निर्माण झाला तर दुसरीकडे मालकांच्या हाताखाली मजूरीवर काम करणाऱ्या कामगारांचा वर्ग निर्माण झाला. मालक व कामगारांचे संबंध औपचारिक स्वरूपाचे झाले. मोठमोठी किमती व गुंतागुंतीची यंत्रे आली, जी संपूर्णपणे एकाच व्यक्तीची किंवा व्यवस्थापनाच्या मालकीची राहिली. वस्तूंचे उत्पादन केवळ नफा तत्त्वावर सुरू झाले. निरनिराळ्या

वितरकांकडून त्या उत्पादित वस्तूंचे वितरण सुरू झाले.

भारतातही साधारणत: हीच परिस्थिती निर्माण झाली. भारत हा जसा कृषिप्रधान देश आहे, तसा तो खेड्यांचाही देश आहे. पूर्वी खेडी ही स्वयंपूर्ण होती. सर्व प्रकारच्या गरजा परगुती हस्तव्यवसाय किंवा पारंपारिक बलुतेदारी पध्दतीच्या सहाय्याने भागवल्या जात असत. सेवा किंवा वस्तूंच्या विनीमयाची पध्दती सरल होती. व्यक्ती व्यक्तींचे संबंध अनौपचारिक होते. औद्योगिक क्रांतीनंतर हेच स्वरूप समस्या प्रधान बनले. विविध प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या. हस्तकौशल्यावर आधारित कुटीरोद्योग मोडकळीस आले. कृषिक्षेत्रात समस्या निर्माण झाल्या. मोठमोठे उद्योग निर्माण झाले, त्यातून अनेक समस्या निर्माण झाल्या. वस्तूवितरणाच्या पध्दतीत अनेक समस्या निर्माण झाल्या. एकुणच क्षेत्रात विविध समस्या किंवा अनैतिकता निर्माण झाल्या. त्यातील काही प्रमुख अनैतिकता खालीलप्रमाणे सांगता येतात.

१) ग्राहकांची फसवणूक : ग्राहक किंवा उपभोक्त्यांची निरनिराळ्या प्रकारे फसवणूक करणे ही वर्तमान काळातील नित्याची बाब झाली आहे. ही या क्षेत्रातील प्रमुख अनैतिकता आहे असे मानले तरी ते चूक ठरणार नाही. किमतीत बदल न करता वस्तूंचा आकार नकळतपणे कमी करणे, नव्या मालात जूना माल बेमालूमपणे मिसळणे, भेसळ करणे, टाकाऊ मालावर सूट जाहीर करणे, जुन्याच वस्तू नव्या वेष्टनात घालणे, वस्तूंच्या किंमती वाढवून त्यात सूट जाहिर करणे, बनावट लेबल लावणे अशा अनेक युक्त्यांच्या सहाय्याने उद्योजक किंवा व्यापारी ग्राहकांची पध्दतशीरपणे फसवणूक करत असतात. ग्राहकांना चांगल्या वस्तू योग्य किंमतीत देणे हे उद्योजक किंवा व्यापाऱ्यांचे कर्तव्य आहे. परंतू अधिक द्रव्यलालसेपोटी त्या कर्तव्याचे पालन होताना दिसून येत नाही.

२) उत्पादनावरील मक्तेदारी : या प्रवृत्तीला एक प्रकारची डाकूगिरी मानली जाते. कारण डाकू लोकांची उघडपणे लूट करत असतात परंतू उद्योजक किंवा व्यापारी लोकांची अप्रत्यक्षपणे लूट करत असतात. यांचे सर्वात महत्वाचे उदाहरण म्हणजे उत्पादन व वितरणातील मक्तेदारी. ग्राहकांना जाहिरातीच्या माध्यमातून किंवा सुरूवातीला सवलतीच्या दरात वस्तूंचा पुरवठा करून सवयी लावल्या जातात. एकदा सवय लागली की नकळतपणे हळू हळू किंमत वाढवली जाते. तसेच कृत्रिम टंचाई निर्माण करूनही किंमती वाढवल्या जातात. म्हणजेच ही ग्राहक किंवा उपभोक्तांची अप्रत्यक्षपणे केली जाणारी लूटच आहे.

३) कामगारांचे शोषण : कामगारांना आपली उपजीविका योग्य रीतीने पार पाडता यावी यासाठी पुरेसे वेतन आणि शारीरिक आरोग्य राखता यावे यासाठी कामाचे निश्चित तास ठरविणे आवश्यक आहे. परंतू या गोष्टीकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नाही. प्रत्येक देशात किमान वेतन कायदा अस्तित्वात असताना त्याचे पालन केले जात नाही. अत्यल्प वेतनावर कामगारांना काम करण्यास भाग पाडले जाते. वाढत्या बेकारीमुळे कामगारांसमोर दुसरा पर्याय नसतो. शिवाय कामाचे निश्चित तास ठरलेले असताना प्रत्यक्षात अतिरिक्त वेळेतही काम करून घेतले जाते. या अतिरिक्त कामाचा मोबदला दिला जात नाही. एक साप्ताहिक सुट्टी नियमानुसार देणे आवश्यक असताना दिली जात नाही. बालमजूर प्रतिबंधक कायदा असताना बालमजुरांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अशा बालमजुरांना वेतन नाममात्र दिले जाते. वाढत्या महागाई निर्देशांकानुसार वेतनवाढ, आरोग्य सुविधा, पाल्यांच्या शिक्षणाची व्यवस्था अशा कोणत्याही गोष्टीकडे व्यवस्थित लक्ष दिले जात नाही. अपघाती अपंगत्व किंवा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटूंबियांच्या भविष्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही अशा अनेक प्रकारातून कामगारांचे शोषण केले जाते.

४) भ्रष्टाचारास प्रोत्साहन : या क्षेत्राशी निगडीत असणाऱ्या व्यक्ती किंवा अधिकारी वर्गास निरनिराळ्या पध्दतीने भ्रष्टाचार करण्यास प्रोत्साहित केले जाते. विशेषत: आयकर अधिकारी, विक्रीकर अधिकारी, लाचलुचपत प्रतिबंधक अधिकारी, भेसळ प्रतिबंधक अधिकारी, सनदी लेखापाल किंवा ज्या संस्थेला माल विक्री करावयाचा आहे तेथील मुख्य खरेदी अधिकारी अशा व्यक्तींना विविध मार्गांनी भ्रष्ट केले जाते. भेटवस्तू देणे, दलाली देणे, मोफत सहलींचे प्रलोभन देणे, लाच स्वरूपात रोख रक्कम देणे असे अनेक मार्ग त्यासाठी अवलंबीले जातात. या मागचा हेतू असा असतो की त्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या सर्व गैरव्यवहाराकडे दुर्लक्ष करावे. म्हणजेच उद्योजक किंवा व्यापारी स्वत: गैरव्यवहार तर करतातच परंतू इतरांनाही भ्रष्टाचारास प्रोत्साहित करतात.

वर प्रतिपादन केलेल्या काही अनैतिकता उद्योग-व्यापारात प्रामुख्याने पहावयास मिळतात. पूर्वी वस्तू खरेदी करताना सर्व जबाबदारी ग्राहकाची आहे असे मानले जात असे. 'नकली मालापासून सावध रहा' असा इशारा ग्राहकांसाठीच असे. परंतू आता त्या तत्त्वात बदल होऊन 'ग्राहक नेहमीच योग्य असतो' असा विचार रूढ झाला आहे. नैतिकतेचे संकेत उद्योजक-व्यापाऱ्यांनी पाळले पाहिजेत असा आग्रह धरला जात आहे. प्रामुख्याने औद्योगिक क्रांतीनंतर व्यापारसंहिता निश्चित स्वरूपात प्रतिपादन केली जाऊ लागली. त्यात बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार वेळोवेळी सुधारणा होत गेल्या. त्यातील काही तत्त्वे खालीलप्रमाणे सांगता येतील.

व्यापार आणि नैतिकता : (Business & Morality)

१) आर्थिक लाभ हे व्यापाराचे प्रमुख सूत्र असले तरी उत्पादनावरील नफा माफक असावा. सर्वसामान्यांना सेवेचा योग्य लाभ मिळू शकेल असे नफ्याचे प्रमाण असावे.

२) उपभोक्त्यांना उच्चप्रतीची उत्पादने योग्य किंमतीत उपलब्ध करुन देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा.

३) मानवतेच्या दृष्टीकोनातून श्रमिकांचे कोणत्याही प्रकारे शोषण करू नये. श्रमिकांच्या हक्काच्या सर्व सुविधा त्यांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा.

४) कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार करू नये किंवा भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तीस प्रोत्साहन देऊ नये.

५) शासनाने तयार केलेले नियम किंवा मार्गदर्शक तत्त्वांचे प्रामाणिकपणे पालन केले पाहिजे.

अशा काही सरळ साध्या तत्त्वांचे जरी उद्योजक-व्यापाऱ्यांनी पालन केले तर या क्षेत्रातील अनैतिकता बऱ्याच प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. या क्षेत्रातील नैतिक सुधारणा घडवून आणण्यासाठी किमान चार घटक प्रभावीपणे कार्य करू शकतात. संबंधित क्षेत्रातील नीतिसंहिता हा सर्वांत प्रभावी घटक आहे. शासनाने देखील जनहितासाठी तसेच योग्य रीतीने कार्य करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या हितासाठी या क्षेत्राकडे वेळोवेळी लक्ष देऊन आवश्यक त्या उपाययोजना केल्या पाहिजेत. विविध धार्मिक संघटना



देखील प्रभावीपणे कार्य करू शकतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रभावी लोकमताचे दडपण या क्षेत्रात सुधारणा घडवून आणू शकते.

व्यापार हा जनसेवेचाच एक प्रकार आहे. मानवाच्या भौतिक गरजांची पूर्तता करणे हे त्याचे कार्य आहे. जेव्हा व्यापार जनसेवेच्या उद्देशाने केला जाईल तेव्हाच त्याचे नैतिक मूल्यमापन करता येऊ शकेल. इतर व्यवसाय ज्या पद्धतीने समाजाची सेवा करतात तशी सेवा या क्षेत्राकडूनही अपेक्षित असते. म्हणून किमान प्रामाणिकपणा, सचोटी अशा गोष्टींच्या सहाय्याने व्यापार करणे आवश्यक आहे.

•••